नि.दावा क्र. ३/२०२०
शारदा वि. भरत
<u>नि.क्र. ७४ पुढे</u>

**प्रतिवादीचा साक्षीदार क्र. २ चा सरतपास श्री. पी. एस. रामटेके यांच्याव्दारे शपथेवर सुरु—**
**नाव—अरुण देवराम हातझाडे, वय—४४ वर्ष,**
**धंदा—ग्रामपंचायत अधिकारी, रा. अर्जुनी/मोरगांव, ता. अर्जुनी/मोरगांव जि. गोंदिया**

मला कोर्टाचा समंस मिळाला होता. मला सदर समंसव्दारे पोहराबाई तानुजी गोंडाणे यांचा मृत्यु नोंद क्र. २५/२०१६ च्या रेकॉर्डची सत्यप्रत तसेच कमलाबाई केवळराम सोनटक्के यांच्या मृत्यु, विवाह नोंद व जन्म दाखल्याची ग्रामपंचायत रेकॉर्डच्या सत्यप्रत घेवून येण्याचे समंस प्राप्त झाले होते. आज मी पोहराबाई तानुजी गोंडाणे यांच्या मृत्यु नोंदणी क्र. २५/२०१६ चा मुळ आणि सत्यप्रतचा रेकॉर्ड आणलेला आहे. आता मला मुळ रेकॉर्ड दाखविण्यात आला त्यावर मृतकाचे नाव पोहराबाई तानुजी गोंडाणे असे आहे. तिच्या आईचे नाव सिताबाई तानुजी गोंडाणे असे नोंद आहे. तिच्या वडीलाचे नाव तानु राखडूजी गोंडाणे असे लिहीले आहे. ती महागांव येथील रहीवासी असल्याची नोंद आहे. तसेच मृत्युचे ठिकाण सुध्दा महागांव आहे. मृत्युची माहीती देणा—याचे नाव विक्रम तानुजी गोंडाणे असे आहे. तसेच त्याची सही सुध्दा रेकॉर्डला आहे. मी सदर मुळ दस्ताऐवजाची सत्यप्रत आज कोर्टात आणलेली आहे. मुळ रेकॉर्ड आणि सत्यप्रत याची माहीती रेकॉर्डप्रमाणे बरोबर आहे. आज मी मुळ दस्ताऐवजाची सत्यप्रत कोर्टात दाखल करीत आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे, त्यास **नि. क्र. ७५** देण्यात येते.

कमलाबाई केवळराम सोनटक्के यांच्या मृत्युची नोंद ग्रामपंचायत

रेकॉर्डला उपलब्ध नाही. तसेच त्यांचा जन्म दाखला व विवाह बाबतची कोणतीही नोंद ग्रामपंचायतला नाही. मी कमलाबाई केवळराम सोनटक्के हिचे जन्म, मृत्यु व विवाह नोंदणीची तपासणी केली असता असा कोणताही रेकॉर्ड ग्रामपंचायतला उपलब्ध नाही. आता मला नि. क्र. ४९ वरील पोहराबाई तानुजी गोंडाणे हिचा मृत्यु प्रमाणपत्र दाखविण्यात आला, त्यावर माझी सही आहे. नि. क्र. ४९ चा मजकुर मुळ रेकॉर्डप्रमाणे बरोबर आहे.

**सरतपास—पुर्ण.**

**प्रतिवादीचा साक्षीदार क्र. २ चा उलटपास वादीचे वकील श्री. एम. एम. खापर्डे यांच्याव्दारे —**

मी २ सप्टेंबर २०२१ पासून ग्रामपंचायत अधिकारी निबंधक जन्म मृत्यु म्हणून ग्रामपंचायत महागांव येथे कार्यरत आहे. मी आज आपला ओळखपत्र दाखल केला नाही. मी ग्रामपंचायत येथे शासनाचे योजनेचे काम, शासनाची योजना गावातील लोकांपर्यत पोहचविणे, विविध विकासाचे काम, जन्म मृत्यु नोंद करणे व विवाह नोंद करणे इत्यादी काम करतो. मी गावाची लोकसंख्याची जनगणना केली नाही. आम्ही मृत्युची नोंद करतांनी मृतक व्यक्तीचा आधारकार्ड व इतर ओळखपत्र घेत नाही. जर अर्ज देतांना एखादया मृतक व्यक्तीच्या नावात चुका असतील त्याची जवाबदारी आम्ही घेत नाही. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की नोंदणी घेतांनी आम्ही प्रत्यक्ष चौकशी करुन ग्रामपंचायतच्या क्षेत्रात त्याची मृत्यु झाली किंवा नाही यानंतर मृत्युची नोंद घेतात. हे मला माहीत नाही की पोहराबाई चा नाव कमलाबाई होवू शकते किंवा नाही. हे म्हणणे खरे नाही की नि. क्र. ४९ वरील दस्ताऐवजाचा मजकुर मी कोणतीही चौकशी न करता भरलेला आहे. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की सदर दस्ताऐवजाच्या वेळी मी कार्यरत नव्हतो. आम्ही मृतक व्यक्तीचा भाउ विक्रम तानुजी गोंडाणे यांच्या सांगण्यावरुन मृत्युची नोंद केली. नि. क्र. ४९ वरील ग्रामपंचायत नोंदणीच्या वेळी मी त्या कार्यालयात त्या पदावर कार्यरत नव्हतो. नि. क्र. ४९ वरील दस्ताऐवजची

नोंद मी नाही केलेली आहे. साक्षीदार स्वताहून सांगतो की सदर नोंद रेकॉर्डप्रमाणे आहे. या रेकॉर्डच्या देखरेख करण्याबाबतचा कोणताही अधिकारपत्र मला मिळाला नाही. साक्षीदार स्वताहून सांगतो की कोर्टाच्या समंसमध्ये असे अधिकारपत्राबाबतच्या कोणतेही उल्लेख नव्हता. रेकॉर्ड अधिकारी मीच आहे. मी सदर रेकार्डचे अधिकारी आहे याबाबतचे अधिकार पत्र आज रोजी दाखल केले नाही. कमलाबाई केवळराम सोनटक्के यांच्या नावाची, जन्म—मृत्यु आणि विवाह नोंद ग्रामपंचायतला नाही याबाबतचा कोणताही दस्तौएवज मी दाखल केला नाही.

मी निवडणुक अधिकारी म्हणून काम केले नाही. मी इलेक्शनची मतदान यादी चेक केली नव्हती. आता मला कमलाबाई सोनटक्के हिच्या नावाचा इलेक्शन कार्ड दाखविण्यात आला. त्यावर कमलाबाई सोनटक्के असे लिहीलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की मी कमलाबाई सोनटक्के हिच्या नावाचा उल्लेख असलेला कागदपत्र उपलब्ध नाही हे मी खोटे सांगत आहे. साक्षीदार स्वताहून सांगतो की मी ग्रामपंचायतच्या रेकॉर्डप्रमाणे पोहराबाई गोंडाणे यांच्या नावाची माहीती दिली. मला कमलाबाई सोनटक्के यांच्या विषयी माहीती नाही.

प्रश्न—तुम्ही कमलाबाई सोनटक्के यांच्या मृत्यु विषयी मौका चौकशी केली का?

उत्तर—कमलाबाई सोनटक्के यांच्या मृत्यु विषयी दस्ताऐवज तपासणी केली असता तिची मृत्यु रेकॉर्डमध्ये नोंद उपलब्ध नाही.

हे मला माहीत नाही की कमलाबाई सोनटक्के व पोहराबाई गोंडाणे ही एकच व्यक्ती आहे. त्याबाबतची मी मौका चौकशी केली नाही. हे म्हणणे खरे नाही की आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

<u>उलटतपास पुर्ण</u>

**प्रतिवादीचा वकीलांनी सदर साक्षीदाराचा फेरतपासाकरीता लेखी अर्ज देवून विनंती केली. सदर अर्ज मान्य केले. प्रतिवादीचे सा. क्र. २ चा फेरतपास वकील श्री. पी. एस. रामटेके यांच्याव्दारे शपथेवर सुरु—**

निवडणुक अधिकारी हा तालुक्याचा तहसिलदार असतो. ग्रामपंचायत सचिव व ग्रामपंचायत अधिकारीकडे निवडणुकीचा कुठलाही अधिकार राहत नाही. तसेच मतदार यादीचे आम्ही काम करीत नाही. हे मला माहीत नाही की

काम्प्युटरच्या माध्यमातून असे अनेक ओळखपत्र तयार केले जातात. ग्रामपंचायतची निवडणुक यादी सुध्दा आम्ही बनवित नाही.

<u>**फेरतपास पुर्ण**</u>—

समक्ष,

श्रवणोत्तर स्विकृत

NEHA VIJAY SHAHU
Digitally signed by NEHA VIJAY SHAHU
Date: 2026.03.11 16:34:27 +0530

(एन.व्ही. साहू)

दि. ११—०३—२०२६

दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
अर्जुनी/मोरगांव